सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पीय तरतुदीमधून शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना सहाय्यक अनुदान (अनिवार्य) वितरीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन निर्णय क्रमांक -मराग्रं-२५२७/(९२/१८)/साशि-५,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १९ मे, २०१८.

वाचा : १) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ ३,दिनांक ०२.०४.२०१८.
२) ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.३२/२०१८-१९/१४३२-३३, दिनांक ०७.०५.२०१८.

प्रस्तावना :

राज्यातील एकूण ११,९९४ शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांच्या सहाय्यक अनुदानासाठी सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात रुपये रु. १२५,००,००,००० /- (रुपये एकशे पंचविस कोटी फ़क्त) इतका निधी अर्थसंकल्पीत करण्यात आला आहे. संदर्भ क्र. १ नुसार अर्थसंकल्पीत निधी खर्च करण्याची मर्यादा ७०% एवढी विहित करण्यात आलेली आहे. शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांच्या परिरक्षण अनुदानासाठी दर्जा / वर्गनिहाय एकूण रुपये रु. १०८,८४,२४,००० (रुपये एकशे आठ कोटी चौ-याऐंशी लाख चोवीस हजार फ़क्त) इतके अनुदान देय असल्याचे संदर्भाधीन क्र. २ च्या पत्रान्वये ग्रंथालय संचालकांनी कळविले आहे. त्यानुषंगाने सन २०१८-१९ या आर्थिक वर्षासाठी मागणी क्रमांक डब्ल्यू-४, २२०५- कला व संस्कृती, १०५ सार्वजनिक ग्रंथालये, (०३)(०१) मध्यवर्ती, जिल्हा व तालुका ग्रंथालयांना सहाय्य (अनिवार्य) (२२०५ ०२९८) ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर) या लेखाशीर्षातर्गत अर्थसंकल्पित निधीच्या ७०% च्या मर्यादेत रु. ८७,५०,००,००० /- (रुपये सत्याऐंशी कोटी पन्नास लक्ष फ़क्त) इतका निधी वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:

राज्यातील एकूण ११,९९४ शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांच्या सहाय्यक अनुदानासाठी सन २०१८-१९ करिता रु. १२५,००,००,००० /- (रुपये एकशे पंचविस कोटी फ़क्त) इतका निधी अर्थसंकल्पीत करण्यात आला आहे. वित्त विभागाच्या परिपत्रक क्र अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ ३,दिनांक ०२.०४.२०१८ नुसार अर्थसंकल्पीत निधी खर्च करण्याची मर्यादा ७० % विहित करण्यात आलेली आहे. त्यानुसार सहाय्यक अनुदानासाठी अर्थसंकल्पीत मंजूर तरतूदीपैकी ७० % म्हणजे रु. १२५,००,००,०००/- (रुपये एकशे पंचविस कोटी फ़क्त) पैकी रु. ८७,५०,००,००० /- (रुपये सत्याऐंशी कोटी पन्नास लक्ष फ़क्त) इतका निधी वितरीत करण्यात येत आहे. सदर निधी संबंधित जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयास वितरीत व खर्च करण्यास ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना शासन मान्यता देण्यात येत आहे.

२.	सदरचा खर्च मागणी डब्ल्यू-४, २२०५- कला व संस्कृती, १०५ सार्वजनिक ग्रंथालये, (०३)(०१) मध्यवर्ती, जिल्हा व तालुका ग्रंथालयांना सहाय्य (अनिवार्य) (२२०५ ०२९८) ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर) या लेखाशिर्षाखाली शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांच्या परिरक्षण अनुदानासाठीचा खर्च चालू वर्ष २०१८-१९ मध्ये अर्थसंकल्पीत तरतूदीपैकी वितरीत केलेल्या ८७,५०,००,००० /- (रुपये सत्याऐंशी कोटी पन्नास लक्ष फ़क्त) या निधीतून भागविण्यात यावा.

३.	सदरचा शासन निर्णय वित्त विभागाच्या संदर्भाधीन दिनांक ०२/०४/२०१८ च्या परिपत्रकास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे. सदर परिपत्रकाच्या परिशिष्टातील अनुक्रमांक ८ मध्ये नमूद अटींची पूर्तता होत आहे. सदरचा खर्च करण्यासाठी संबंधित जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाच्या कार्यालय प्रमुखांना आहंरण व संवितरण अधिकारी व ग्रंथालय संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. अनुदानाच्या रक्कमेची उपयोगिता प्रमाणपत्रे संबंधित कार्यालय प्रमुखांनी विहित मुदतीत सादर करणे आवश्यक राहील.

४.	हा शासन निर्णय शासनाचे www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०१८०५१९१७२५३६५७०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Anil Vithalrao Saware

Digitally signed by Anil Vithalrao Saware
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher And Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=073348b7a8767f0f7865422df1e65ce2f3bcdf6786e4712e2c088a9ac4ffee3f, cn=Anil Vithalrao Saware
Date: 2018.05.19 17:23:35 +05'30'

(अनिल वि. सावरे)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. महालेखापाल-१ (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), मुंबई
२. महालेखापाल -२ (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), नागपूर
३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
४. ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
५. निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई
६. अपर मुख्य सचिव (उवतंशि) यांचे स्वीय सहाय्यक
७. कक्ष अधिकारी (साशि १), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय
८. निवडनस्ती (साशि-५),उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय